## पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी

२ रा मजला, वैद्यकिय मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.

जाहिरात क्र. /२०२१
दि. / /२०२१.

### Walk - In -Interview (थेट मुलाखत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) साठी एकत्रित मानधनावर कंत्राटी पद्धतीने खालील पदे भरावयाची आहेत. याकामी खालीलप्रमाणे नमुद केलेल्या पदांकरिता शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | एकत्रीत मानधन | शैक्षणिक पात्रता व अनुभव | प्रवर्गानुसार आरक्षण | मुलाखतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | स्त्रीरोगतज्ञ | ०३ | ७५,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस व स्त्रीरोग विषयातील पदवी (एम.डी./एम.एस./डी.एन.बी.) किंवा पदविका.<br>२) इंडियन मेडीकल कौन्सिलकडील किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील नोंदणी आवश्यक.<br>३) स्त्रीरोगतज्ञ या पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | अ.जाती-०१<br>इ.मा.व.-०१<br>खुला-०१ | दि.२६/११/२०२१<br>सकाळी-१० ते ११ |
| २ | बालरोगतज्ञ | ०४ | ७५,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी./डी.एन.बी(बालरोग) पदवी परिक्षा उत्तीर्ण.<br>२) इंडियन मेडीकल कौन्सिलकडील किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील नोंदणी आवश्यक.<br>३) बालरोगतज्ञ या पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | अ.जाती-०१<br>अ.जमाती-०१<br>वि.जा.अ.-०१<br>खुला-०१ | दि.२६/११/२०२१<br>सकाळी-१० ते ११ |
| ३ | भूलतज्ञ | ०३ | ७५,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी./डी.एन.बी.(ॲनेस्थिशिया) पदवी.<br>२) इंडियन मेडीकल कौन्सिलकडील किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील नोंदणी आवश्यक.<br>३) भूलतज्ञ या पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | अ.जाती-०१<br>इ.मा.व.-०१<br>खुला-०१ | दि.२६/११/२०२१<br>सकाळी-१० ते ११ |
| ४ | वैद्यकिय अधिकारी (पुर्ण वेळ) | १० | ६०,०००/- | १) एम.बी.बी.एस. उत्तीर्ण आवश्यक.<br>२) इंडियन मेडीकल कौन्सिलकडील किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडील नोंदणी आवश्यक.<br>३) वैद्यकिय अधिकारी या पदाचा कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | अ.जमाती-०१<br>वि.जा.अ.-०१<br>इ.मा.व.-०३<br>ई.डब्ल्यु.एस.-०१<br>खुला-०४ | दि.२६/११/२०२१<br>सकाळी-१० ते ११ |
| ५ | गुणवत्ता आश्वासक सहाय्यक | ०१ | १८,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>२) शासकिय परिक्षा मंडळाकडील मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. असणे आवश्यक.<br>३) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत | खुला-०१ | दि.२६/११/२०२१<br>सकाळी-१० ते ११ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य | | |
| ६ | स्टाफनर्स | २५ | २०,०००/- | १) १२ वी उत्तीर्ण आवश्यक.<br>२) जी.एन.एम.किंवा बी.एस्सी. नर्सिंग आवश्यक.<br>३) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक.<br>४) नर्सिंग या कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | अ.जाती.-०३<br>अ.जमाती-०२<br>वि.जा.अ.-०१<br>इ.मा.व.-०५<br>ई.डब्ल्यु.एस.-०४<br>खुला-१० | दि.२६/११/२०२१ सकाळी-१० ते ११ |
| ७ | औषधनिर्माता (फार्मासिस्ट) | ०३ | १७,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील डी.फार्म (D.Farm)/बी फार्म. (B.Farm) पदवी आवश्यक<br>२) इंडियन/महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलकडील नोंदणी असणे आवश्यक<br>३) संगणक कामकाजाचे ज्ञान असणे आवश्यक<br>फार्मासिस्ट या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | वि.जा.अ.-०१<br>वि.मा.प्र.-०१<br>ई.डब्ल्यु.एस.-०१ | दि. २६/११/२०२१ सकाळी-१० ते ११ |
| ८ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (लॅब टेक्नीशियन) | ०३ | १७,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी.ही पदवी आवश्यक<br>२) शासन मान्य संस्थेकडील डी.एम.एल.टी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३) संगणकवरील (Ms, Excel and Word skill evaluation) या कामकाजाचे ज्ञान असणे आवश्यक.<br>४) लॅब सहाय्यक या कामाचा अनुभव आवश्यक<br>५) लॅबटेक्निशियन या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | अ.जाती-०१<br>खुला-०२ | दि. २६/११/२०२१ सकाळी-१० ते ११ |

<u>अटी व शर्ती-</u>

१. उपरोक्त नमूद सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रीत मानधनाची असून त्यांचा कालावधी हा दि.३१ मार्च, २०२२ पर्यंत असेल.

२. राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणा-या सर्व उमेदवारांची निवड थेट मुलाखतीने करण्यात येईल.

३. मुलाखती दरम्यान स्त्रीरोगतज्ञ, बालरोग तज्ञ,भूलतज्ञ, वैद्यकिय अधिकारी (पूर्ण वेळ), गुणवत्ता आश्वासक सहाय्यक या पदांची कौशल्य मुल्यमापन चाचणी न घेता थेट संबंधीत पदाचे कामकाजाबाबत (उदा. अनुक्रमे राष्ट्रीय कार्यक्रम कामकाज) मुलाखत घेणेत येईल.

४. मुलाखती दरम्यान स्टाफनर्स,फार्मासिस्ट व लॅब टेक्नीशियन या पदांची कौशल्य मुल्यमापन चाचणी घेणेत येईल.

५. सदरची पदे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राहतील, सदर पदांचा पिंपरी चिंचवड म.न.पा. आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

६. स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, भूलतज्ञ, वैद्यकिय अधिकारी (पूर्ण वेळ) या पदांना राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर दरानुसार वेतन अदा करण्यात येईल. तसेच गुणवत्ता अश्वासक सहाय्यक, स्टाफनर्स, औषधनिर्माता व प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदांना शासनाकडील अनुदानाव्यतिरिक्त किमान वेतन दरानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचे अधिकार व निर्णय मा. आयुक्त. पिं.चिं.म.न.पा. यांचेकडे राहतील. तसेच सदर पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना मानधना बाबत शासनाकडून वेळेवेळी प्राप्त सुचना लागू राहतील.

७. सदरची पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने प्रकल्पासाठी भरावयाची असुन सदर पदावरील उमेदवारांना प्रथम नियुक्ती ११ महिने कालावधीची देण्यात येईल व शासनाकडून याबाबत प्राप्त मार्गदर्शक सूचना लागू राहतील. तसेच सदरचा प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.

८. सदरची नियुक्ती पुर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही ज्या दिवशी सोसायटीस सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय मानधनावरील सेवा समाप्त केली जाईल.

९. सदर पदांचे संख्येमध्ये अथवा आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

१०. मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचेकडील दि.२९/०९/२०१८ अन्वये सदर पदासांठी उमेदवारांची सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. तसेच सेवानिवृत्त उमेदवारांसाठी ६५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल राहील परंतु वय वर्ष ६० नंतर जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

११. अर्जदार हा संबंधित पदासाठी शरीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१२. कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असणे आवश्यक आहे.

१३. सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगीत करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१४. मुलाखत एकास पाच (१:५) या प्रमाणे उमेदवारांना मुलाखतीस बोलवण्यात येईल. याकरिता उपरोक्त नमुद करणेत आलेल्या मुलाखतीच्या वेळापत्रकामधील दिनांकास पहिल्या १ तासामध्ये म्हणजे सकाळी १० ते ११ या वेळेत जेवढे उमेदवार उपस्थित असतील अशा उमेदवारांची हजेरी नोंदवून व त्यांचेकडून विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे घेण्यात येतील. त्यानंतर उपस्थित असलेल्या उमेदवारांची मुलाखतीसाठी नोंदणी करणेत येणार नाही व याबाबतचा अंतिम निर्णय मा.सदस्य सचिव तथा वैद्यकिय संचालक, पिं.चिं.म.न.पा. यांचा राहील.

१५. मुलाखतीला जास्त उमेदवार आल्यास छाननीअंती एका पदास पाच उमेदवार या प्रमाणे पदानुसार शैक्षणीक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावण्यात येईल.

१६. मुलाखत (परिक्षा) एकुण १०० गुणांची राहील.

१७. या मध्ये जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अर्हतेच्या शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार जास्तीत जास्त ५० गुण देण्यात येतील.
   अ) उमेदवाराचे शिक्षणाच्या शेवटच्या वर्षाचे गुण ग्राहय धरले जातील.
   ब) उमेदवारास ५० गुण पुढील प्रमाणे देय राहतील- अतिरिक्त शिक्षण- पदवी/पदविका-१० गुण, कौशल्य चाचणी-१० गुण, विषय ज्ञान- ०५ गुण, अनुभव- ०५ गुण ( प्रत्येक वर्ष ०१ गुण)
   क) तोंडी मुलाखत- २० गुण

१७. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था यांचा अथवा राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

१८. मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित रहावे. त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय नाही.

१९. शासकिय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्ती पूर्वी मिळत असलेले वेतन वजा निवृत्ती वेतन अशी जी रक्कम येईल ती मानधन म्हणुन देण्यात येईल.

२०. उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावा.

२०. सदर पदभरती अंतर्गत निवड करण्यात येणा-या उमेदवारांकडून सदरचे पदावर कायमस्वरुपी हक्क सांगणार नसलेबाबत र.रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

२१. सदर जाहिरातीमधील नमूद पदांची निवड समिती मार्फत निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

<u>कागदपत्रे-</u>

१. इच्छुक व पात्र उमेदवारांनी थेट मुलाखतीला येताना म.न.पा.वेबसाईट www.pcmcindia.gov.in वर दिलेल्या नमुन्यातील अर्ज, शैक्षणीक अर्हता प्रमाणपत्रे, विहित कालावधीमधील कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटो, जन्मतारखेचा पुरावा (जन्माचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला), रहिवाशी दाखला, ओळख प्रमाणपत्र, पदानुसार शैक्षणीक अर्हता प्रमाणपत्र, जातीचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र

**२२. मुलाखतीचे ठिकाण- प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड**

सही/-
(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

वैद्यकिय संचालक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

## <u>उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना</u>

| फोटो |
|---|

प्रति,

मा. आयुक्त.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**विषय – ........................................... या पदासाठी अर्ज**

**संदर्भ - दि. - -२०२१ रोजीची जाहिरात**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीनुसार मी मनपाचे रुग्णालयामध्ये हंगामी पध्दतीने ......................... या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे:

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशील</th><th colspan="11">माहिती</th></tr>
<tr><td>१</td><td>संपुर्ण नाव</td><td colspan="11">आडनाव   नाव   वडील / पतीचे नाव</td></tr>
<tr><td>२</td><td>पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता</td><td colspan="11"></td></tr>
<tr><td>३</td><td colspan="6">ई-मेल</td><td colspan="6">मोबाईल क्र.</td></tr>
<tr><td>४</td><td>जन्मतारीख</td><td colspan="11"></td></tr>
<tr><td>५</td><td>लिंग</td><td colspan="3">पुरुष</td><td colspan="4">स्त्री</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td rowspan="2">६</td><td colspan="5">सद्यस्थितीत महापालिकेत कामकाज करीत आहे काय</td><td colspan="7">होय / नाही</td></tr>
<tr><td>होय असल्यास</td><td colspan="6">दवाखान्याचे नाव -</td><td colspan="5">पदनाम -</td></tr>
<tr><td rowspan="3">७</td><td colspan="5">जात -</td><td colspan="7">जातीचा प्रवर्ग -</td></tr>
<tr><td>SC</td><td>ST</td><td>VJ (A)</td><td>NT (B)</td><td>NT (C)</td><td>NT (D)</td><td>OBC</td><td>SBC</td><td>SEBC</td><td>EWS</td><td>OPEN</td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td rowspan="7">९</td><td colspan="12">शैक्षणिक अर्हतेचा तपशील</td></tr>
<tr><td colspan="3">शैक्षणिक अर्हता</td><td colspan="3">उत्तीर्ण वर्ष</td><td colspan="3">मिळालेले गुण</td><td colspan="3">टक्केवारी</td></tr>
<tr><td colspan="3"></td><td colspan="3"></td><td colspan="3"></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3"></td><td colspan="3"></td><td colspan="3"></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3"></td><td colspan="3"></td><td colspan="3"></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3"></td><td colspan="3"></td><td colspan="3"></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="3"></td><td colspan="3"></td><td colspan="3"></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td rowspan="4">१०</td><td colspan="2">तांत्रिक व इतर अर्हता तपशील</td><td colspan="10"></td></tr>
<tr><td>अ.क्र.</td><td colspan="6">संस्थेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक</td><td colspan="3">पदनाम</td><td colspan="2">कालावधी</td></tr>
<tr><td></td><td colspan="6"></td><td colspan="3"></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td></td><td colspan="6"></td><td colspan="3"></td><td colspan="2"></td></tr>
</table>

सदरची पदे ही तात्पुरत्या / हंगामी स्वरुपातील नेमणुकीची असून ११ महिन्यांकरीताच्या नेमणुकीची आहेत याची मला जाणीव असून याबाबत मी भविष्यात कोठेही व कोणताही दावा दाखल करणार नाही. वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती, तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती

सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी / चूकीची अथवा अपुरी असल्याचे आढळून आल्यास नेमणुकीच्या कोणत्याही टप्प्यावर या माहितीच्या आधारे महापालिका सेवेतून कमी करण्यास तसेच या भरतीकरीताच्या अपात्रतेस मी स्वत: जबाबदार राहिल. याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई देखील केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ - अर्जदाराची सही -

दि. / /२०२१ अर्जदाराचे नाव ------------------------------

सहपत्रे - अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्रे २) जन्मतारखेचा पुरावा ३)अनुभवाची प्रमाणपत्रे

४) जात प्रमाणपत्र ५) रहिवास पुरावा ६) इतर कागदपत्रे.